पुण्य नगरी

# विदर्भात प्रथमच वर्धा येथील बीआयटीमध्ये बजाज ऑटोचे बेस्ट सेंटर

**पुण्य नगरी** / प्रतिनिधी



**वर्धा :** बजाज ऑटो लि.ने त्यांच्या प्रमुख सीएसआर कौशल्य उपक्रमासाठी विदर्भात प्रथमच बजाज इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी वर्धा यांच्याशी सहकार्य करून संस्थेत बजाज इंजिनिअरिंग स्किल्स ट्रेनिंग केंद्र सुरू केले आहे.

या प्रगत कौशल्य प्रशिक्षण केंद्राचा उद्देश अभियांत्रिकी विद्यार्थ्यांना समकालीन आणि विकसित होत असलेल्या उत्पादन तंत्रज्ञान कौशल्यांसह सुसज्ज करणे हा आहे. या प्रशिक्षण कार्यक्रमाचा शुभारंभ २५ फेब्रुवारी रोजी संस्थेच्या कॅम्पसमध्ये करण्यात आला. शिक्षा मंडळाचे अध्यक्ष संजय भार्गव, बीआयटीचे प्राचार्य डॉ. नरेंद्र कान्हे आणि बीआयटी येथील बेस्ट केंद्र प्रमुख डॉ. मनीष पासरकर यांनी शिक्षा मंडळाचे प्रतिनिधित्व केले तर बजाज ऑटो लि.चे प्रतिनिधी समीर नाबर आणि पवनकुमार चौहान हेही उपस्थित होते.

बेस्ट प्रोग्राममध्ये डिप्लोमा आणि पदवीधर विद्यार्थ्यांसाठी तयार केलेले प्रमाणन कार्यक्रम आहेत. यामध्ये मेकॅट्रॉनिक्स, मोशन कंट्रोल आणि सेन्सर टेक्नॉलॉजी, रोबोटिक्स आणि ऑटोमेशन, आर्टिफिशियल इंटेलिजन्स, मशीन लर्निंग, ऑगमेंटेड आणि व्हर्च्युअल रिॲलिटी, पीएलसी, एचएमआय, एमईएस आणि इंडस्ट्री ४.० सारख्या प्रगत विषयांचा समावेश करणारे इंटरडिसीप्लिनरी लर्निंग मॉड्यूल समाविष्ट आहेत. भारतातील इतर दोन केंद्रांमध्ये जिथे विद्यार्थ्यांनी असे प्रशिक्षण घेतले, त्यांना १०० टक्के प्लेसमेंट मिळाले आहे. बेस्टच्या पहिल्या बॅचमध्ये १२३विद्यार्थ्यांची नोंदणी आहे ज्यामध्ये महाराष्ट्रातील इतर विभागातील आणि इतर राज्यांतील विद्यार्थ्यांनीही नोंदणी केली आहे. बजाज ऑटो लिमिटेड प्रशिक्षणार्थींना सुरुवातीला ८०% शिष्यवृत्ती देत असल्याने ते अत्यंत परवडणाऱ्या शुल्कात हे प्रशिक्षण घेऊ शकतात. यावेळी अध्यक्ष संजय भार्गव म्हणाले की, बीआयटीच्या प्रगतीमध्ये हे अत्यंत महत्त्वाचे पाऊल आहे आणि त्यांनी ह्यावेळी प्रशिक्षणार्थींना मार्गदर्शन केले. ते म्हणाले की बेस्ट बीआयटी तसेच विदर्भातील विद्यार्थ्यांच्याही. नोकरीच्या संधी बदलेल. बी आय टी चे प्राचार्य डॉ. नरेंद्र कान्हे यांनी बजाज ऑटो लिमिटेडबद्दल कृतज्ञता व्यक्त केली. हा उपक्रम उद्योग आणि शैक्षणिक क्षेत्रातील दरी भरून काढण्यासाठी, विदर्भातील विद्यार्थ्यांसाठी उत्तम नोकरीच्या संधी सुनिश्चित करण्यासाठी महत्त्वपूर्ण पाऊल उचलेल.

Wardha Edition
Feb 26, 2025 Page No. 04

TheHitavada
Vidarbha Line | 2025-02-26 | Page- 8
ehitavada.com

# Bajaj Auto Wardha, BIT launches BEST

■ District Correspondent
WARDHA, Feb 25





(Left) Bajaj Engineering Skills Training Centre, (Right) Dignitaries sitting on the dais.

BAJAJ Auto Ltd, Wardha, in collaboration with Bajaj Institute of Technology (Anghu), launched Bajaj Engineering Skills Training (BEST) centre for its flagship CSR skills initiative, the other day.

The aim of this advanced skills training centre is to expose students to contemporary and evolving production technologies and also to make them equipped with skills.

This training programme was attended by Sanjay Bhargava, Chairman of the Board of Education, BIT Principal Dr Narendra Kanhe and BEST Centre at BIT Chief Dr Manish Pasarkar represented the Education Board while Bajaj Auto Ltd representatives Sameer Nabar and Pawan Kumar Chauhan.

BIT Wardha is the only Institute in Vidarbha region to host a BEST centre. The new centre is equipped with state-of-the-art infrastructure and high-quality equipment sourced globally.

The skilling centre will offer students the opportunity to work with industry-level equipment and software used in the manufacturing sector, giving them hands-on experience that closely mirrors real-world conditions thus bridging the gap between industry and academia.

The BEST programme features certification programs tailored for diploma and graduate students. It includes interdisciplinary learning modules that cover advanced topics such as Mechatronics, Motion Control&Sensor Technology, Robotics and Automation, Artificial Intelligence, Machine Learning, Augmented and Virtual Reality, PLC, HMI, MES, and Industry 4.0. The curriculum is designed by senior engineers from Bajaj Auto Ltd, ensuring industry relevance and practical applicability.

In the other two centres in India where students enrolled for such training, 100 per cent placements have been obtained by them.

The programme is for 6 months for graduate students and 4 months for diploma students. BIT students would complete it in their 8th semester itself. Students from other colleges would do it during July to December, after completing their degree programme. The first batch of BEST has 123 student enrolment in which students from other regions of Maharashtra and of other states have also enrolled.

As Bajaj Auto Ltd is initially offering 80% of scholarship to trainees, they are able to pursue this training at highly affordable fees. Chairman Sanjay Bhargava said that this marked a very significant next step in the upgradation of BIT and guided the trainees.

Dr Narendra Kanhe, Principal of BIT, expressed his gratitude to Bajaj Auto Ltd. This initiative will mark a significant step forward in bridging the gap between industry and academia, fostering better job opportunities for students.

Powered by Bharati Web

शेष | पेज 14 पर

# बजाज इंस्टीट्यूट में शुरू हुआ बीईएसटी कौशल प्रशिक्षण केंद्र

- बजाज ऑटो लिमिटेड देगा छात्रों को 80 फीसदी छात्रवृत्ति

ब्यूरो | वर्धा.

पिपरी मेघे स्थित बजाज इंस्टीट्यूट ऑफ़ टेक्नोलॉजी में मंगलवार 25 फरवरी को बीईएसटी कौशल प्रशिक्षण कार्यक्रम का शुभारम्भ किया गया। बजाज ऑटो लिमिटेड ने अपनी प्रमुख सीएसआर कौशल पहल के लिए संस्थान में बजाज इंजीनियरिंग स्किल्स ट्रेनिंग (बेस्ट) केंद्र की शुरुआत की है। इस उन्नत कौशल प्रशिक्षण केंद्र का उद्देश्य इंजीनियरिंग छात्रों को समकालीन और विकसित प्रौद्योगिकी कौशल से अवगत करवाना है। इस प्रशिक्षण कार्यक्रम में स्नातक और डिप्लोमा कर रहे छात्रों को क्रमशः 6 और 4 महीनो के लिए आधुनिक तकनीकी विषयों के बारे में प्रशिक्षित किया जाएगा। इस कौशल प्रशिक्षण कार्यशाला के पहले बैच में 123 शेष | पेज 14 पर



## रोजगार के नए अवसर सुनिश्चित करेगा

बजाज इंजीनियरिंग स्किल्स ट्रेनिंग योजना बजाज इंस्टीट्यूट ऑफ टेक्नोलॉजी के प्रगति के लिए यह कौशल प्रशिक्षण कार्यक्रम एक बहुत ही महत्वपूर्ण कदम है। इस स्किल्स ट्रेनिंग सेंटर की वजह से वर्धा और विदर्भ में छात्रों के लिए नौकरी के अवसर बढ़ेंगे। यह पहल उद्योग जगत और शिक्षा जगत के बीच की खाई को खत्म कर नवाचार को बढ़ावा देने का काम करेगी।

– **संजय भार्गव,** सभापति, शिक्षा मंडल, वर्धा

लोकमत

# बजाज ऑटोच्या सीएसआर फंडातून बीआयटी झाली 'बेस्ट'



लोकमत न्यूज नेटवर्क

**वर्धा** : स्थानिक बजाज इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी (बीआटी) येथे बजाज ऑटोच्या सीएसआर फंडातून कौशल्य उपक्रमासाठी संस्थेत बजाज इंजिनिअरिंग स्किल्स ट्रेनिंग (बेस्ट) केंद्र सुरू केले आहे.

या प्रगत कौशल्य प्रशिक्षण केंद्राचा उद्देश अभियांत्रिकी विद्यार्थ्यांना समकालीन आणि विकसित होत असलेल्या उत्पादन तंत्रज्ञान कौशल्यांसह सुसज्ज करणे असल्याचे सांगितले. या प्रशिक्षण कार्यक्रमाचा मंगळवार, २५ रोजी पासून संस्थेच्या कॅम्पसमध्ये करण्यात आला. यावेळी शिक्षा मंडळाचे अध्यक्ष संजय भार्गव, बीआयटीचे प्राचार्य डॉ. नरेंद्र कान्हे, बेस्ट केंद्र प्रमुख डॉ. मनीष पासरकर, बजाज ऑटोचे प्रतिनिधी समीर नाबर आणि पवनकुमार चौहान यांची उपस्थिती होती. बेस्ट केंद्र सुरू केल्याने बीआयटी आणि विदर्भ विभागातील, टियर २ आणि ३ अभियांत्रिकी, आणि डिप्लोमा महाविद्यालये, विशेषत: मेकॅनिकल, इलेक्ट्रिकल, इलेक्ट्रॉनिक्स, इन्स्ट्रुमेंटेशन इंजिनीअरिंग शिकणाऱ्या विद्यार्थ्यांना लक्षणीय फायदा होईल, अशी अपेक्षा आहे. हा कार्यक्रम पदवीधर विद्यार्थ्यांसाठी ६ महिने आणि डिप्लोमा विद्यार्थ्यांसाठी ४ महिन्यांसाठी आहे. बेस्टच्या पहिल्या बॅचमध्ये १२३ विद्यार्थ्यांची नोंदणी आहे. ज्यात महाराष्ट्रातील इतर विभागातील आणि इतर राज्यांतील विद्यार्थ्यांनीही नोंदणी केली आहे. बजाज ऑटो लिमिटेड प्रशिक्षणार्थींना सुरुवातीला ८० टक्के शिष्यवृत्ती देत असल्याने ते अत्यंत परवडणाऱ्या शुल्कात हे प्रशिक्षण घेऊ शकतात.

## विदर्भातील एकमेव संस्था

बीआयटी वर्धा ही विदर्भातील एकमेव संस्था आहे जिथे 'बेस्ट सेंटर' स्थापित झाले आहे. नवीन केंद्र अत्याधुनिक पायाभूत सुविधांनी सुसज्ज आहे आणि जागतिक स्तरावर मिळणाऱ्या उच्च दर्जाची उपकरणे येथे आहेत.